दै. गोदातीर दि. 20/06/25

# चोरी आणि जबरी चोरीतील आरोपी स्थानिक गुन्हे शाखेच्या जाळ्यात

## बारड आणि शिवाजीनगर पोलिसांना देत होते गुंगारा



**नांदेड (प्रतिनिधी)**– शहराच्या शिवाजीनगर आणि बारड पोलीस ठाण्याच्या हद्दीत चोरी आणि जबरी चोरी करणाऱ्या गुन्हेगारांच्या मुसक्या स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकांनी आवळल्या. बारड ठाण्याच्या हद्दीतून जबरी चोरी करणाऱ्या चोरट्यांकडून वेगवेगळ्या कंपनीचे मोबाईल तर शिवाजीनगर ठाण्याच्या हद्दीतून चोरी करणाऱ्या दोघांना पोलिसांनी अटक केली आहे.

खडकपुरा भागात राहणारा चोर सय्यद बिलाल सय्यद फैयाज (वय १९ राहणार सैलाबनगर) आणि त्याचा मित्र शाहेद मटके मूळचा सोलापूर हल्ली मुक्काम खडकपुरा आणि एका अल्पवयीन साथीदाराला सोबत घेऊन या तिघांनी शहराच्या शिवाजीनगर भागातील बल्लेवार फर्निचर समोर एका महिलेची पर्स चोरली होती. पर्समध्ये ४० हजार रुपयांचा मोबाईल विविध महत्त्वाचे कार्ड होते. तसेच एमएच२६- एए- ८६ ८३ ही दुचाकी पोलिसांनी जप्त केली आहे. स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक उदय खंडेराय यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस उपनिरीक्षक मिलिंद सोनकांबळे व त्यांच्या पथकाने आरोपींच्या मुसक्या आवळल्या. काही दिवसांपासून हे चोरटे शिवाजीनगर पोलिसांना चकमा देत होते.

दुसऱ्या घटनेत स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस उपनिरीक्षक महेश कोरे यांच्या पथकाने बारड पोलिसांना पाहिजे असलेला आरोपी सागर काशिनाथ गवळे राहणार गौतम नगर सांगवी याला जबरी चोरी प्रकरणात अटक केली. त्याचा साथीदार रवी खिल्लारे राहणार पावडेवाडी आणि ओम्या सूर्यवंशी राहणार गौतमनगर सांगवी या तिघांनी मिळून बारड पोलीस ठाण्याच्या हद्दीत जबरी चोरी केली होती. या चोरट्यांकडून ६६ हजार रुपये किमतीचे वेगवेगळ्या कंपनीचे मोबाईल पोलिसांनी जप्त केले आहेत. पोलीस उपनिरीक्षक महेश कोरे यांच्या फिर्यादीवरून बारड पोलीस ठाण्यात सागर गवळी, रवी खिल्लारे आणि ओम सूर्यवंशी यांच्याविरुद्ध जबरी चोरीचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या दोन्ही कारवाईबद्दल पोलीस अधीक्षक अबिनाश कुमार, अतिरिक्त पोलीस अधीक्षक सुरज गुरव, डॉ. खंडेराव धरणे, उपविभागीय पोलिस सुशीलकुमार नायक, स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक उदय खंडेराय यांनी फौजदार मिलिंद सोनकांबळे व महेश कोरे यांच्या पथकाचे कौतुक केले आहे.